# रेग्युलर दिवाणी मुकदमा नं. ३५४/२०१८ मधील निशाणी १८ वरील आदेश

(लक्ष्मी मासाळ वि. सुभाष शेळके)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने वादीच्या निशाणी ५ च्या अर्जास प्रतिवादीने दिलेली कैफियत हिच निशाणी ५ ला म्हणणे म्हणून वाचणेत यावे, यासाठी दाखल केला आहे.

२. सदर अर्जास वादीतर्फे आक्षेप नोंदविणेत येऊन प्रतिवादी यांनी तीन ते चार वर्षांनी पुस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. त्या विलंबाबत कोणतेही कारण अर्जात नमूद केलेले नाही. तसेच सदर अर्जात नमूद केलेली कारणे ही अयोग्य व चुकीची आहेत. त्यामुळे सदरचा अर्ज नांमजूर करण्याची विनंती केली आहे. यदाकदाचित न्यायालय प्रतिवादीचा अर्ज मंजूर करणेच्या निर्णयाप्रत आलेस प्रतिवादीस जास्तीत–जास् दंड करणेत यावा, अशीही विनंती केली आहे.

३. प्रतिवादीचा अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. वादी व प्रतिवादींतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

४. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द करारपत्रावरुन खरेदीपत्र होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांच्या अर्जात नमूद केलेल्या कारणांमध्ये प्राथमिक स्तरावर तथ्य असल्याचे दिसून येते. तसेच सदरचा अर्ज मंजूर केलेस वादीचे नूकसान होणार नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायाला अनुसरुन व दोन्ही पक्षकारांचे हित लक्षात घेवून सदरचा अर्ज मंजूर होणे योग्य होणार आहे. त्यामुळे दोन्ही पक्षकारांमधील असलेला वाद संपुष्टात आणणेसाठी व न्यायदानासाठी मदत होईल. दाव्याचे स्वरुप व अर्जात नमुद केलेली हकीकत लक्षात घेता माझ्या मते, दाव्याचा गुणदोषावर अंतिम निर्णय होणेसाठी प्रस्तुत

प्रतिवादी यांच्या अर्जातील कैफियत हीच निशाणी ५ ला म्हणणे वाचणेत यावे ही मागणी प्रतिवादीवर खर्चाची रक्कम बसवून मान्य करणे योग्य होईल. सबब खालीलप्रमाणे आदेश करणेत येत आहे.

## आ दे श

प्रतिवादी यांनी रक्कम रुपये ३००/– (रक्कम रुपये तीनशे मात्र) वादी यांना देणेचे अटीवर प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

Uday Mahadev Jadhav
Digitally signed by Uday Mahadev Jadhav
Date: 2022.03.04 13:23:44 +0530

ठिकाण –मिरज. (उदय महादेव जाधव )
दिनांक – ०३.०३.२०२२. चौथे सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर, मिरज.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | :- | Mr. Uday Mahadev Jadhav,<br>4th Jt. Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Miraj, Dist.Sangli. |
| Name of Stenographer | :- | Mr. S. S. Shingana |
| Date of decision / typed | :- | 03.03.2022 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 03.03.2022 |
| Judgment/order uploaded on | :- | 04.03.2022 |